अर्थवृत्तान्त करिअर वृत्तान्त व्हिवा चतुरंग वास्तुरंग लोकरंग बालमैफल थिएटर Thats इट Trek इट Drive इट Tech इट Health इट

27 October 2014

मागील अंक ई-पेपर प्रतिक्रिया ॲडव्हान्स सर्च

लोकसत्ता डॉट कॉमवर शोधा शोधा

लोकसत्ता
लोकमान्य, लोकशक्ती!

Apps Font Problem

Like 545k Follow 18.7K followers

मुखपृष्ठ महाराष्ट्र मुंबई पुणे देश-विदेश क्रीडा अर्थसत्ता के.जी. टू कॉलेज वृत्तान्त संपादकीय विशेष नवनीत राशिभविष्य मनोरंजन लाईफस्टाईल लोकसत्ता लाईव्ह फोटो गॅलरी

मुखपृष्ठ विशेष

## विशेष

# तटबंदीत अडकलेली मानसिक आरोग्य सेवा



डॉ. अभिजित मोरे

Published: Sunday, October 5, 2014

Like 20 Tweet 0 g+1 0 1

**शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या गाजावाजानंतर दिल्लीवरून पंतप्रधानांकडून 'पॅकेज' आले, पण इथली आरोग्य व्यवस्था सुधारायला, समुपदेशन व मानसिक आरोग्य सेवा पुरविण्याच्या दृष्टीने काहीही पावले उचलली गेली नाहीत..**

समाजात मानसिक तणावाची आणीबाणी असल्याचे एक भयानक वास्तव आहे. त्यातून विद्यार्थ्यांपासून ते नोकरदार आणि शेतकऱ्यांपासून ते चकाचक कॉर्पोरेट क्षेत्रात काम करणारे असे कोणीच सुटलेले नाही. महाराष्ट्रातील ५० ते ६० लाख लोकांना मानसोपचाराची व समुपदेशनाची गरज आहे. निमहँस या नावाजलेल्या मनोविज्ञान संस्थेच्या अभ्यासामध्ये एका शहरातील आयटी क्षेत्रातील ३६ टक्के लोक विविध मानसिक आजारांनी त्रस्त असल्याचे दिसून आले. कॉर्पोरेट क्षेत्रात काम करणाऱ्यांपकी ५० टक्के तणावाखाली आहेत. त्यापकी २० टक्के उदासीनतेचे रुग्ण आहेत, अशी माहिती मानसिक विकारांवर काम करणाऱ्या 'आसरा' संस्थेची माहिती आहे. दहावी-बारावी आणि इंजिनीअरिंगच्या परीक्षा व निकाल जवळ आले, की विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या हे तर जणू ठरलेलेच आहे. १९९५ ते २०१३ पर्यंत राज्यातील सुमारे ६० हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या अशी आकडेवारी उपलब्ध आहे. राष्ट्रीय गुन्हा नोंद अन्वेषण विभागाच्या अहवालानुसार सन २०१३ मध्ये भारतात सर्वात जास्त १६,६२२ आत्महत्या महाराष्ट्रात, तर शहरांपकी सर्वात जास्त आत्महत्या मुंबईत झाल्या आहेत. (दररोज तीन आत्महत्या). तज्ज्ञांच्या मते प्रत्येक एका आत्महत्येच्या तुलनेत इतर २० लोक आत्महत्या करण्याचा प्रयत्न करत असतात. भोंदूबाबा-बुवांचे फुटलेले पेव आणि स्ट्रेस मॅनेजमेंटची वाढती वर्कशॉप्स हीसुद्धा समाजातील या वाढत्या ताणाचीच द्योतके आहेत.

वेगाने वाढणाऱ्या या समस्येकडे आपली शासन व्यवस्था मात्र अद्यापही डोळसपणे बघू शकलेली नाही. म्हणूनच विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या गाजावाजानंतर दिल्लीवरून पंतप्रधानांकडून 'पॅकेज' आले, पण इथली आरोग्य व्यवस्था सुधारायला, समुपदेशन व मानसिक आरोग्य सेवा पुरविण्याच्या दृष्टीने काहीही पावले उचलली गेली नाहीत. महाराष्ट्रातील मानसिक आरोग्य सेवा ही ठाणे, रत्नागिरी, येरवडा (पुणे) व नागपूर या चार प्रादेशिक मानसिक रुग्णालयांत कैद झाली आहे. समुपदेशन केंद्रांचा राज्यभरात पत्ता नाही. कोणतीही हेल्पलाइन नाही. प्राथमिक स्तरावर याबाबतचे उपचार व औषधे मिळण्याची सोय नाही. प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उप-जिल्हा
य सेवेबाबतचे प्रशिक्षण
। आहेत. अशा रुग्णांना
ा(!) समाजात आहे.
रुग्णाचा खूप त्रास
मानसिक रुग्णालयांच्या

संबंधीत बातम्या
मानसिक स्वास्थ्यासाठी
मानसिक आरोग्याबाबत जाणीव जागृकता महत्वाची- न्या. अनभुले

मुंबई वृत्तान्त
मंदीने ग्रासलेल्या बिल्डर्सना बड्या समूहांचा आधार!
पालिका वास्तूंची दुरुस्ती रखडली
ठाणे वृत्तान्त
कामचुकार कर्मचाऱ्यांना यंदा बोनस नाही
अग्निशमन दल आपल्या दारात..!
महामुंबई वृत्तान्त
सिडकोने डॉक्टर बदलूनही कचरा समस्या कायम
एनएमएमटीचे बसस्टॉप रिक्षाचालकांना आंदण
नाशिक वृत्तान्त
दीपोत्सवावर लक्ष्मीपूजनाचा साज
धूर फवारणीसाठी तोकडी यंत्रणा
नागपूर वृत्तान्त
दिवाळीत विमान, खासगी बसेस भाडे दुप्पट
ध्वनी प्रदूषणाबाबत निवासी क्षेत्र व फटाक्यांसाठी शासनाचे वेगवेगळे निकष

महाराष्ट्र
भाजपचे मुखेडचे आमदार...
भाजपचे नांदेड जिल्ह्यातील नवनिर्वाचित आमदार गोविंद राठोड यांचे...
जिल्ह्यात ठिकठिकाणी...
पाथर्डी तालुक्यातील जवखेडे खालसा येथील दलित हत्याकांडातील आरोपी...

मुंबई
महाराष्ट्राचा रथ पुढे...
भाजप नेत्यांवर अफझलखानी फौज, दिल्ली की बिल्ली अशी...

मध्य रेल्वे नेहमीप्रमाणे...
मध्य रेल्वेची गेल्या अनेक दिवसांतील वाहतूक विस्कळीत होण्याची...

देश-विदेश
लोकसभेच्या ४०० सदस्यांची...
काँग्रेसाध्यक्षा सोनिया गांधी, उपाध्यक्ष राहुल गांधी, भाजपचे ज्येष्ठ...

काश्मीर मुद्द्यावर...
काश्मीरच्या मुद्द्यावर भारताची मनमानी चालू देणार नाही, असा...

क्रीडा
डब्ल्यूटीए स्पर्धेतील विजयाबद्दल...
डब्ल्यूटीए टेनिस स्पर्धेचे विजेतेपद जिंकल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी...

रिअल माद्रिद विजयी...
फिफा विश्वचषकादरम्यान इटलीच्या जॉर्जियो चिएलिनीच्या खांद्यावर चावा घेतल्यानंतर...

अर्थसत्ता

तटबंदीत - समाजापासून दूर दीर्घकाळ ॲडमिट होण्यासाठी! कोणाचाही संपर्क नाही! अपवाद वगळता राजकीय नेत्यांना याचे फारसे काही पडलेले नाही. समाजाने तर या रुग्णांवर फुलीच मारलेली!!!

सर्व काही वाईटच आहे असे नाही. मेडिकल कॉलेज व जिल्हा रुग्णालयात मानसोपचारतज्ज्ञ उपलब्ध आहेत. थोड्या काळासाठी मानसिक रुग्णांना ॲडमिट करण्याची सोय इथे आहे. नातेवाईकही सोबत राहू शकतात. त्यामुळे चांगली सेवा मिळण्याची व लवकर बरे होऊन परत जाण्याची शक्यता वाढते; पण तिथे औषधे सहसा एका आठवड्यापुरतीच मिळतात. मानसिक रुग्णांना औषधे महिनोन्महिने, कधी कधी अनेक वर्षेसुद्धा लागतात. मग औषधासाठी दर आठवड्याला कुठे फेऱ्या मारायच्या? त्यामुळे अनेक रुग्ण व त्यांचे नातेवाईक शेकडो किलोमीटरचा प्रवास करून या चार प्रादेशिक मानसिक रुग्णालयात येतात. शेजारच्या कर्नाटकात 'बेल्लारी' जिल्ह्यात कम्युनिटी मेंटल हेल्थचा प्रयोग यशस्वीपणे राबविला गेला आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या डॉक्टर्स व आरोग्य कर्मचाऱ्यांना योग्य प्रशिक्षण दिले व औषधे उपलब्ध करून दिली, तर त्यांच्या माध्यमातून बहुतांशी मानसिक आरोग्य सेवा प्राथमिक स्तरावरच यशस्वीपणे देता येऊ शकते, हे सिद्ध केले आहे. मानसिक आरोग्य सेवा ही जेवढी विकेंद्रित व सर्वसामान्य आरोग्य व्यवस्थेशी जोडलेली असेल तेवढी जास्त ती समाजापर्यंत पोहोचू शकते, असे अनुमान जागतिक पातळीवरील तज्ज्ञांमध्ये रुजत आहे. आपल्याकडे राबवत असलेल्या जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रमामागेही हीच संकल्पना आहे; पण तो बहुतांशी कागदावरच आहे! राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमाचा निधी राज्य सरकारकडे पडून आहे!! जिथे एकूणच आरोग्य व्यवस्थेचीच आबाळ असेल तर मानसिक आरोग्य सेवेची काय स्थिती असणार?

मागील वृत्त पुढील वृत्त

Latest

Write a comment...

Name

Email

Post

Dr.

in our Social System & some dignity in their Livelihood. I know that Many of the Disabled & Mental people are wandering in majority of Cities in India. They are begging. Only those who can afford , can be looked after, what a partiality in Society. Charities have their stake but it is minimal. Mental people should be well resourced for their mental health & energy & their entertainment thro' music & creativity in Arts & Festivals.

Points 785

19 days ago · (0) · (0) · reply (0) ·

Dr.

I feel all Disabled people especially Elderly Disabled should be given Pension of Rs.5000/- pm or some sort of Social Security Payments to live on day to day basis. Are they all not Entitled? Is this BJP Government do something about it? It is very important matter that all these Mental & Disabled people are allowed to

नगर/पश्चिम महाराष्ट्र वृत्तान्त

कोल्हापूर महापालिकेची बँक हमी प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून जप्त

'आयआरबी' कर्मचा-यांना टोप गावातून पिटाळले

मराठवाडा वृत्तान्त

औरंगाबादेतही गारांसह पाऊस

भाजपचे शिष्टमंडळ आज राज्यपालांना भेटणार

रविवार वृत्तान्त

आजही सुपरस्टार!

सलमानने 'जय हो'चे पोस्टरही रंगवले

विदर्भरंग

वारसा : हजारो ख्वाहिशे ऐसी..

वनातलं मनातलं : निरोपाचे विडे!

## मोस्ट कमेन्टेड

आई जगदंबेची कृपा..

पक्ष हरले, मतदार जिंकले!

दहा मुले असलेल्या हिंदू कुटुंबाला शिवसेना देणार २१ हजारांचं बक्षीस

काँग्रेसमध्ये राहुलविरोधक वाढले

कालबाह्य लष्करी सामग्रीविरोधात अधिकाऱ्यांच्या पत्नींचा 'एल्गार'

शिवसेनेला सत्तेपासून दूर ठेवा

BLOG: भाजप आमदारांनो सावधान!

भाजपचे मुखेडचे आमदार गोविंद राठोड यांचे निधन

## मोस्ट रीड

आई जगदंबेची कृपा..

BLOG: भाजप आमदारांनो सावधान!

भाजपचे मुखेडचे आमदार गोविंद राठोड यांचे निधन

काँग्रेसमध्ये राहुलविरोधक वाढले

नथुरामने गांधीऐवजी नेहरूंची हत्या करायला हवी होती

संवत्सर स्वागत!...
हिंदू नववर्षांच्या पहिल्याच दिवशी प्रमुख निर्देशांकांमध्ये तेजी नोंदवीत...



टेस्को अध्यक्षपदाचा...
तोट्यातील वित्तीय निष्कर्षांत त्रुटी राहिल्याबद्दल टेस्को या ब्रिटनमधील...



के.जी. टू कॉलेज

ठाण्यातील विद्यार्थ्यांना...
व्हीआयटी युनिव्हर्सिटी प्रस्तुत आणि विद्यालंकार यांच्या सहकार्याने आयोजित...

पूर्वप्राथमिक शिक्षकांना निवडणुकीचा...
निम्मा ऑक्टोबर महिना लोटला, दिवाळी सुरू झाली तरीही...



संपादकीय

आई जगदंबेची कृपा.....
ताटावर बसावयाचे आणि भोजनास मात्र हात लावायचा नाही,...



निवडणुकीनंतरची झाडाझडती!...
निवडणुकीतील विजयाने निर्धास्त न राहता, प्रत्येक निवडणुकीनंतर संघटनेची...



विशेष

'सुखोई'चे दुखणे.....
तब्बल ५५ हजार फूट उंचीवरून आणि ध्वनीहून अधिक...



श त क...
शुभ दिन, शुभ वेळ पाहताना पंचांगातील तिथी,...



मनोरंजन

दंगावाली स्टोरी...
दंगावाली स्टोरी'दुनियादारी' या गाजलेल्या चित्रपटाच्या दिग्दर्शकाचा प्रेमकथा सांगणारा...



अति लांबलचक...
ब्रॅण्ड एसआरकेचा दिवाळी ब्लॉकबस्टर चित्रपट म्हणून 'हॅपी न्यू...



नवनीत